कोकणातील अरिष्ट

# न्याय्य उपाययोजनेसाठी जनवकिली



प्रयासने केलेल्या उपक्रमांचा अहवाल

प्रयास

आरोग्य, ऊर्जा, शिक्षण आणि पालकत्व या विषयांतील विशेष प्रयत्न

**संसाधने व उपजीविका गट**

प्रयास आरोग्य, ऊर्जा, शिक्षण आणि पालकत्व या विषयांतील विशेष प्रयत्न

**संसाधने व उपजीविका गट, प्रयास**
'मंगेशपुष्प', सर्व्हे नं. १३३,
स्वामी विवेकानंद सोसायटी,
बायफजवळ, वारजे, पुणे ४११०५२.
फोन : ०२० २५२३ २८३६
फॅक्स : ०२० २५४२ ०३३७
E mail: reli@prayaspune.org
web site: www.prayaspune.org

नोंदणीकृत कार्यालय
प्रयास, अमृता क्लिनिक, आठवले कॉर्नर,
कर्वे रोड, पुणे ४११००४.
फोन : २५४४ १२३०, २५४२ ०३३७.

छायाचित्रे : © संदेश भंडारे, पुणे.
अंक मांडणी : मिडीया इमेजेस, पुणे.
मुद्रण : युनिक ऑफसेट, पुणे.

**खासगी वितरणासाठी. एप्रिल २००६**

# प्रस्तावना

२००५ सालच्या जुलै-ऑगस्ट महिन्यांमध्ये झालेली अतिवृष्टी व प्रलयंकारी पुरामुळे संपूर्ण महाराष्ट्र प्रभावित झाला. या आपत्तीमुळे मुंबई शहराच्या जोडीनेच महाराष्ट्रातील ग्रामीण भागांचे (विशेषत: कोकण विभागाचे) मोठे नुकसान झाले. मात्र उर्वरित महाराष्ट्रातील नुकसान व त्यामागील कारणांची पुरेशी चर्चा माध्यमे व राजकीय पातळीवरही झालेली दिसली नाही. हे लक्षात घेऊन या आपत्तीमुळे कोकणातील ग्रामीण भागांमध्ये स्थानिकांच्या उपजीविकेवर झालेले विविधांगी परिणाम आपत्तीमागील मूळ कारणांसह अभ्यासण्याचा एक प्रयत्न प्रयास संस्थेच्या संसाधने आणि उपजीविका गटाने केला होता. बहुतेक वेळा आपत्तीची चर्चा राजकारणी, अधिकारी, व तज्ज्ञांच्या दृष्टिकोनातून होते. आपद्ग्रस्त स्थानिकांचा दृष्टिकोन यामध्ये दुर्लक्षितच रहातो. म्हणूनच आपत्तीचे परिणाम व त्यावरील शासकीय प्रतिसाद स्थानिकांच्या नजरेतून तपासणे हे या जलद व गुणात्मक अभ्यासामागील मूळ उद्दिष्ट होते. या अभ्यासातून पुढे येणाऱ्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर तातडीने कार्यवाही व्हावी यासाठी शासनास ठोस सूचना करतानाच व्यापक नागरी समाजघटकांमध्ये या विषयावर चर्चा उपस्थित करणे हा या प्रयत्नाचा केंद्रबिंदू होता.

वरील प्रयत्नांचा एक भाग म्हणून प्रयासने प्रसारमाध्यमे आणि विधिमंडळस्तरावर जनवकिलीचे (ॲडव्होकसी) काही उपक्रम हाती घेतले. स्थानिक स्तरावर काम करणाऱ्या संस्था, जनसंघटना, प्रसारमाध्यमे, लोकप्रतिनिधी अशा सर्व घटकांनी या उपक्रमांमध्ये अतिशय महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. या संपूर्ण प्रक्रियेतील अनुभव आमच्यासाठी बरेच काही शिकवणारे होते. संक्षिप्तरूपाने या अनुभवांची मांडणी करणे हेच या छोट्या पुस्तिकेचे उद्दिष्ट आहे.

या संपूर्ण उपक्रमामध्ये आम्हाला ज्यांची अतिशय मदत झाली अशा सर्व जनसंघटना, संस्था, पत्रकार, लोकप्रतिनिधी आणि शासकीय अधिकाऱ्यांचे आम्ही मन:पूर्वक आभार मानतो.

**संसाधने आणि उपजीविका गट, प्रयास**

# अनुक्रमणिका


- पार्श्वभूमी ५
- जनवकिली- साठीचे विविध उपक्रम ७
- माध्यम लक्ष्यी जागरण मोहीम ८
- विधिमंडळ स्तरावरील प्रयत्न १०
- जनवकिलीचे इतर प्रयत्न १४
- शासकीय विभागासोबत विचारविनिमय १५
- समारोप १५

- परिशिष्ट एक : कोकणवासियांच्या दृष्टीतून अरिष्टाचे परिणाम, मागण्या व उपाययोजनांबाबतच्या शिफारशी १६

- परिशिष्ट दोन : जनवकिलीच्या प्रयत्नांमध्ये साथ देणारे लोकप्रतिनिधी, संस्था-संघटना, वृत्तपत्रे, वृत्तपत्र-संघ, वृत्तवाहिन्या २३









# पार्श्वभूमी

जुलै-ऑगस्ट २००५ मध्ये झालेली अतिवृष्टी ही गेल्या दीड-दोन दशकांमध्ये राज्यावर आलेल्या आपत्तीच्या मालिकेतील आणखी एक भीषण घटना होती. दुष्काळ, भूकंपाच्या जोडीनेच आपत्तीचा आणखी एक प्रकार संपूर्ण महाराष्ट्राने अनुभवला. या पुरामुळे महाराष्ट्राच्या जवळजवळ सर्व भागांना पुराचा फटका बसला असला तरीही या घटनेची झळ महाराष्ट्रात मुंबई आणि संपूर्ण सह्याद्रीलगतच्या कोकण किनारपट्टीस सर्वाधिक बसली.
या अरिष्टास शासन, जनसंघटना, राजकीय पक्ष, प्रसारमाध्यमे, संशोधन संस्था आणि जागरूक नागरिक अशा विविध समाजघटकांनी आपापल्या परीने प्रतिसाद दिला. तसेच स्वयंसेवी संस्था, विविध विश्वस्त संस्था आणि वृत्तपत्रे-पत्रकार या सर्वांनीच पूरग्रस्तांसाठी मदत गोळा करण्यात व पोचवण्यात महत्त्वाचा वाटा उचलला. लोकप्रतिनिधींनी विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी अतिवृष्टीनंतर लगेचच केली होती, यावरून या आपत्तीमुळे झालेले नुकसान व जनजीवनावरील झालेल्या नुकसानाच्या परिणामांची तीव्रता लक्षात येते.

अतिवृष्टी-पुरामुळे मुंबईसह अनेक ठिकाणी निर्माण झालेल्या विदारक स्थितीनंतर अतिवृष्टी व पुरामागील विविधांगी कारणांची चर्चा सुरू झाली. वर्तमानपत्रे व विविध प्रसारमाध्यमांमध्ये याबाबत विविध दृष्टिकोन मांडले जाऊ लागले. ‘अनेक वर्षांचे उच्चांक मोडणारा विक्रमी पाऊस’ व ‘अलमट्टी धरणातून वेळेवर पुरेसे पाणी सोडण्यामध्ये कर्नाटक सरकारने केलेली टाळाटाळ’ ही दोन महत्त्वाची कारणे अनुक्रमे कोकण व पश्चिम महाराष्ट्रातील पुरामागे आहेत अशी भूमिका शासनाने घेतली. परंतु, मुंबई वगळता महाराष्ट्रातील इतर ठिकाणच्या, विशेषत: ग्रामीणभागातील पुरामागील मूळ कारणांची तपशीलवार मीमांसा मात्र पुरेशा प्रमाणात पुढे आली नाही. पुरानंतरच्या काळात सरकारने पूरग्रस्तांच्या मदतीसाठी जाहीर केलेल्या मदतीची योग्यायोग्यता व मदतीच्या वाटपातील गैरव्यवहार या मुद्द्यांभोवतीच माध्यमातील चर्चा फिरत राहिली. या चर्चेमध्ये आपत्तीमागील मूळ कारणांकडे पुरेशा गांभीर्याने आणि विस्ताराने लक्ष दिले गेले नाही. यामुळे आपत्तीमागील मूळ कारणांच्या अनेक बाजू दुर्लक्षित राहिल्या. याबरोबरच आपत्तीमुळे विविध क्षेत्रांमध्ये (शेती, घरे, गुरे, मजुरी इ.) झालेल्या नुकसानाचे मोजमाप पुरेशा गांभीर्याने केले गेले नाही. तसेच, विविध समाजघटकांवर आणि त्यांच्या उपजीविकांवर होत असणाऱ्या दीर्घकालीन परिणामांचीही पुरेशी दखल शासकीय पातळीवरून घेतली जात नसल्याचे आढळले. या परिस्थितीत स्थानिकांच्या दृष्टिकोनातून या आपत्तीचे व त्याबाबतच्या शासकीय प्रतिसादाचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न ‘प्रयास’ने केला. कोकणातील, विशेषतः रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यातील ग्रामीण भागामध्ये झालेले नुकसान व त्यामागील कारणे आपद्ग्रस्तांच्या दृष्टिकोनातून समजून घेण्याचा उद्देश यामागे होता. याकरिता ८ तालुक्यांतील ४७ वाड्यांमध्ये भेटी देऊन एक जलद व गुणात्मक (क्वालिटेटिव्ह) अभ्यास पूर्ण केला गेला. या अभ्यासावर आधारित एक अहवाल मराठीमध्ये तयार केला गेला.

हा अहवाल रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील पेण, रोहा, माणगाव, महाड, खेड, चिपळूण, गुहागर, आणि संगमेश्वर या आठ तालुक्यांतील ४७ वाड्यांमध्ये केलेल्या क्षेत्र पाहाणीवर आधारीत होता. पाहाणीसाठी वाड्या निवडताना त्या-त्या भागातील संघटना-संस्था यांच्या मदतीने, मुख्यतः दुर्गम भागातील नुकसानग्रस्त वाड्या निवडण्यावर भर दिला गेला. या अहवालासाठी केलेल्या माहिती संकलनामध्ये प्रत्यक्ष नुकसानग्रस्त कुटुंबे, तसेच नुकसानग्रस्त वाड्यांमध्ये काम करणाऱ्या संस्था-संघटनांच्या कार्यकर्त्यांचा सहभाग तर होताच; परंतु या जोडीनेच शासकीय अधिकारी, कृषी, भूगर्भशास्त्र, हवामान इ. विषयातील तज्ज्ञ यांच्या मुलाखतींचाही आवर्जून समावेश केला होता. तसेच, 'कोणत्याही अरिष्टाचा परिणाम समाजातील तळाच्या घटकांवर सर्वाधिक होतो' या वस्तुस्थितीची दखल घेऊन शेतमजूर, भूमिहीन, दलित, आदिवासी या घटकांतील कुटुंबांशी व तसेच स्त्रियांशी स्वतंत्रपणे संवाद साधण्यात आला व त्याद्वारे त्यांचे अनुभव, दृष्टिकोन, आणि अपेक्षा जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला होता.

हा अहवाल कोकणातील पुराविषयी असला तरी या विषयाची व्याप्ती लक्षात घेता त्याची उपयुक्तता केवळ कोकणातील अरिष्टापुरती मर्यादित नव्हती हे उघड आहे. 'अतिवृष्टी व पुराच्या या आपत्तीमागील कारणे व त्यावरील उपायांबाबत नागरी समाजाच्या विविध घटकांमध्ये चर्चा उपस्थित करणे' हे अहवाल तयार करण्यामागील मूळ उद्दिष्ट होते. याबरोबरच, अहवालाच्या निमित्ताने पुढे आलेल्या व्यापक प्रश्नांवर दीर्घकालीन उपाययोजना करण्यासाठी शासनास ठोस सूचना करणे हेही सदर अहवाल तयार करण्यामागील एक महत्त्वाचे उद्दिष्ट होते.

कोकणातील अरिष्टाच्या निमित्ताने शासनाच्या अरिष्टविषयक धोरणांची चिकित्सा करणे आणि त्यामध्ये लोकाभिमुख बदल सुचवणे याकरिता करावयाच्या जनवकिलीच्या प्रयत्नांमध्ये या प्रयत्नांसाठी 'आधारभूत दस्तावेज' (बेस - डॉक्युमेंट) म्हणून सदर अहवाल अतिशय महत्त्वाचा ठरला.

जनवकिलीसाठी हा अहवाल 'आधारभूत दस्तावेज' म्हणून उपयुक्त ठरावा म्हणून अहवालाची रचना व मांडणी नेहमीच्या साचेबद्ध पद्धतीने न करता जाणीवपूर्वक वेगळी ठेवण्यात आली. अतिवृष्टीच्या काळातील आपदग्रस्तांचे अनुभव, शासकीय अधिकाऱ्यांची मते, छोट्या-छोट्या परंतु महत्त्वपूर्ण नोंदी, वेगळी दृष्टी देणाऱ्या स्थानिक पातळीवरील घटना या सगळ्यांचा अहवालामध्ये समावेश करण्यात आला होता. याबरोबरच अतिवृष्टी व पुरामुळे झालेले नुकसान व त्यांच्या विविधांगी परिणामांचे नेमके चित्र वाचकासमोर उभे राहावे यासाठी अहवालामध्ये मजकुराच्या जोडीनेच छायाचित्रांचाही अंतर्भाव केला गेला. अहवालामध्ये मांडण्यात आलेल्या आपद्ग्रस्तांच्या मागण्यांवर शासनाद्वारे घेतले जातील असे संभाव्य आक्षेप व त्यानंतर आपद्ग्रस्तांच्या वस्तुस्थितीचा आधार घेऊन त्या संभाव्य आक्षेपांचा प्रतिवाद करण्यासाठी मांडावयाचे मुद्दे अशा पद्धतीने मजकुराची मांडणी केली गेली. शासनाकडे सादर करण्यात येणाऱ्या मागण्या अधिक समतोल, व्यवहार्य, व नेमक्या व्हाव्यात, तसेच शासनस्तरावर त्यांची

स्वीकारार्हता वाढावी या उद्देशाने असा प्रयत्न करण्यात आला. याबरोबरच स्थानिक आपद्ग्रस्त, विविध संस्था-संघटनांचे कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी, आणि आपद्ग्रस्तांसाठी काम करणारे नागरी समाजातील विविध घटक या सर्वांना शासनाशी वाटाघाटी करताना सदर अहवालाचा उपयोग अधिक प्रभावीपणे करता यावा असा देखील या मांडणीमागील उद्देश होता.

अहवाल तयार करण्यामागे असणारी उद्दिष्टे गाठण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून प्रयासने काही जनवकिलीचे उपक्रम हाती घेतले. या जनवकिलीच्या उपक्रमांचे तपशील व त्यातून मिळालेली उपलब्धी यांचा संक्षिप्त गोषवारा या दस्तावेजामध्ये सादर केला आहे. या उपक्रमातील प्रयासचे अनुभव व निष्पत्ती विविध समाजघटकांसमोर मांडणे असे या दस्तावेजाचे उद्दिष्ट आहे.

## जनवकिली-साठीचे विविध उपक्रम

'शोषित-वंचित घटकांच्या हितासाठी अभ्यास व विश्लेषणावर आधारित जनवकिली करणे' अशा व्यापक भूमिकेतून विशिष्ट प्रश्नावर नियोजनपूर्वक केलेला प्रयासच्या संसाधने व उपजीविका गटाचा हा पहिलाच प्रयत्न होता, हे अहवालाच्या सुरुवातीलाच नमूद करावेसे वाटते. जुलै महिन्यातील आपत्तीनंतर हिवाळी अधिवेशनापर्यंतच्या अतिशय मर्यादित कालावधीमध्ये 'अभ्यास, अहवाल लेखन, आणि जनवकिलीचे प्रयत्न' असा तिपेडी उपक्रम प्रयासने राबवला. या उपक्रमामध्ये आपत्तीच्या घटनेची तीव्रता, त्याचे स्थानिक पर्यावरणीय परिस्थिती आणि ग्रामीण समाजजीवनावरील परिणाम, घटनेमागची कारणमीमांसा, व आपत्तीस शासनाने दिलेला प्रतिसाद या मुद्द्यांवर विशेष भर देण्याचा प्रयत्न केला.

या उपक्रमांमध्ये प्रामुख्याने प्रसारमाध्यमे आणि विधिमंडळ अशा दोन स्तरांवर जनवकिलीच्या माध्यमातून जाणीव-जागृतीचे प्रयत्न केले गेले. प्रसारमाध्यमांच्या स्तरावर 'स्थानिक व राज्यपातळीवर विविध ठिकाणी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदा' व 'इतरत्र आयोजित केलेले परिसंवाद' हे दोन प्रमुख उपक्रम राबवण्यात आले. विधिमंडळ स्तरावरील प्रयत्नांमध्ये 'कोकणातील लोकप्रतिनिधींशी वैयक्तिक स्तरावर भेटी व चर्चा' आणि 'नागपूर येथील विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान केले गेलेले प्रयत्न' हे दोन उपक्रम राबवले गेले. या उपक्रमांचे संक्षिप्त वृत्त पुढे देत आहोत.

## माध्यम-लक्ष्यी जागरण मोहीम (मिडिया कँपेन)

प्रयासचा कोकणातील पुरावरचा मराठीतील सविस्तर अहवाल प्रत्यक्ष आपत्तीनंतर तीन महिन्यांच्या अल्पावधीतच प्रकाशित करण्यात आला. या प्रश्नाचे स्वरूप गंभीर आणि व्यापक असूनही नागरी समाजात याबाबतची चर्चा मात्र आपत्तीनंतर तीन महिन्यांच्या आतच ओसरत चालली होती. जसे काही 'आपत्तीचा प्रश्न फक्त आपद्ग्रस्त लोकांचाच आहे आणि बाकी नागरी-समाजाला त्याच्याशी काहीच

देणेघेणे नाही' असे वातावरण सर्वत्र होते. या काळामध्ये महाराष्ट्राच्या राजकीय पटलावरील स्थित्यंतराचे विश्लेषण करण्यामध्ये बरीच प्रसारमाध्यमे गुंतलेली होती. अशा परिस्थितीमध्ये माध्यमांसह सर्वांचेच लक्ष या विषयाकडे वेधणे हे एक महत्त्वाचे लक्ष्य होते.

वरील पार्श्वभूमीवर विधिमंडळाचे नागपूर येथे होणारे हिवाळी अधिवेशन डोळ्यांसमोर ठेवून या माध्यम-लक्ष्यी जागरण मोहिमेची आखणी केली गेली. अतिवृष्टी-पुरामुळे ओढवलेल्या आपत्कालीन परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी फेटाळली गेल्याने हिवाळी अधिवेशनामध्ये या विषयाशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण बाबींवर चर्चा व निर्णय होणे अपेक्षित होते. हे लक्षात घेऊन अधिवेशनापूर्वी व दरम्यान प्रसारमाध्यमांच्या सहयोगाने या विषयावर पुन्हा एकदा चर्चा सुरू करण्याचा हा प्रयत्न होता.

अतिवृष्टी व पुरामागील स्थानिक कारणे व त्यातील वैविध्य, त्यातून समोर आलेले आपत्ती व्यवस्थापना-बाबतचे व्यापक मुद्दे स्थानिक स्तरावरील विविध घटकांपर्यंत पोचणे आवश्यक होते. तसेच या अहवालातून प्रसिद्ध केले गेलेले निष्कर्ष व मागण्याही स्थानिक परिस्थितीच्या अभ्यासाच्या आधारे मांडण्यात आल्याने स्थानिकांच्या दृष्टीने त्याचे महत्त्व अनन्यसाधारण होते. याबरोबरच ही माहिती स्थानिकांपर्यंत पोचवणे हे प्रयासचे उत्तरदायित्वही होते. या दृष्टीने रत्नागिरी जिल्ह्यात चिपळूण या तालुक्याच्या ठिकाणी व रत्नागिरी (शहर) या जिल्ह्याच्या ठिकाणी आणि रायगड जिल्ह्यामध्ये अलिबाग येथे (जिल्ह्याच्या प्रमुख ठिकाणी) अशा एकूण तीन पत्रकार परिषदा घेण्यात आल्या.

सदर विषय अधिक व्यापक समाजघटकांपर्यंत पोचवणे आणि विशेषत: धोरणकर्त्यांना त्याची दखल घेणे भाग पडावे हा तर या सर्व प्रयत्नांचा गाभा होता. यासाठी राज्यपातळीवरील प्रयत्नांची आवश्यकता होती. या उद्देशाने मुंबई व पुणे येथेही पत्रकार परिषदा आयोजित करण्यात आल्या.

## माध्यमांसाठी माहिती संच

प्रसारमाध्यमांनी सदर विषय अधिक नेमकेपणाने मांडावा, यासाठी अतिवृष्टी-पुरावरील अहवालाच्या जोडीने माध्यमांसाठी स्वतंत्र माहिती संच (मीडिया किट) तयार करण्यात आले होते. या संचांमध्ये पत्रकारांसाठी सदर प्रक्रियेची माहिती देणारी टिपणे, आपत्तीशी संबंधित बाबींसंदर्भातील विषयवार मागण्या, क्षेत्र पाहाणीच्या वेळी केल्या गेलेल्या 'केस स्टडीज', प्रेस-नोट्स अशा विविध माहितीचा समावेश होता. (वाचकांच्या संदर्भासाठी यापैकी एक टिपण सदर दस्तावेजास परिशिष्ट एकच्या स्वरूपात जोडले आहे.) या सर्व माहितीच्या इंग्रजी व मराठी प्रती या संचामध्ये समाविष्ट केल्या होत्या. याशिवाय, आपत्तीमुळे झालेले नुकसान दर्शवणारी निवडक छायाचित्रे व संपूर्ण अहवालाची एक कॉम्पॅक्ट डिस्क (सी. डी.) या गोष्टींचाही सदर संचामध्ये समावेश केला होता.

प्रत्यक्ष अतिवृष्टी व पुराच्या काळामध्ये मदत गोळा करण्यापासून ते माध्यमांमध्ये दुर्लक्षित घटना, माहिती प्रसिद्ध करण्यासाठी खास प्रयत्न करण्यापर्यंत अनेक पत्रकारांनी अतोनात कष्ट घेतले होते. यामुळे आपत्कालीन परिस्थितीचा अनुभव अनेक स्थानिक आणि राज्यस्तरीय पत्रकारांजवळ होता आणि या संपूर्ण प्रक्रियेमध्ये त्यांची मते, अनुभव, आणि निरीक्षणांना महत्त्वाचे स्थान असणार होते. पत्रकार परिषदांच्या आयोजनाच्या वेळी प्रत्येक ठिकाणी स्थानिक वृत्तपत्रांसह सर्व पत्रकारांशी वैयक्तिक भेटी देऊन या विषयावर त्यांच्याशी चर्चा केली गेली. या पत्रकार परिषदांच्या आयोजनामध्ये स्थानिक संस्था-संघटनांचाही पुढाकार होता. याशिवाय विविध टी. व्ही. वृत्तवाहिन्यांच्या प्रतिनिधींशीही आवर्जून चर्चा केली गेली.

## पत्रकार परिषदांना मिळालेला प्रतिसाद

कोकणामध्ये आयोजित केलेल्या पत्रकार परिषदांसह सर्व ठिकाणी या विषयास अतिशय सकारात्मक प्रतिसाद मिळाला. सर्वच ठिकाणी स्थानिक / विभागीय वृत्तपत्रांचे व तसेच साप्ताहिकांचे प्रतिनिधी (विविध ठिकाणी साधारणपणे २५-४० या दरम्यान) उपस्थित होते. याबरोबरच राज्यस्तरीय वृत्तपत्रांच्या विभागीय आवृत्त्या आणि वृत्तवाहिन्यांचे (टीव्ही) प्रतिनिधीही आवर्जून उपस्थित राहिले. नियोजनपूर्वक आयोजित केल्या गेलेल्या पत्रकार परिषदा व त्यासोबत दिल्या गेलेल्या सामग्रीमुळे नोव्हेंबर महिन्याच्या शेवटी सलग आठवडाभर कोकण, मुंबई, आणि पुण्यातील विविध वृत्तपत्रांमध्ये (एकूण १५ वृत्तपत्रे) प्रयासच्या अहवालात मांडला गेलेला दृष्टिकोन व विविध उपाययोजना याबाबतच्या बातम्या व लेख प्रसिद्ध झाले. या परिषदांना स्थानिक वृत्तपत्रांनी दिलेल्या प्रतिसादाचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. याबरोबरच टीव्हीवरील विविध वृत्तवाहिन्यांनी (सह्याद्री वाहिनी, झी. टीव्ही मराठी व हिंदी वाहिनी, सहारा व इ. टीव्ही मराठी अशा एकूण ५ वाहिन्यांनी), तसेच स्थानिक केबल-वाहिन्यांनी पत्रकार परिषदांच्या बातम्या आणि प्रयासच्या अभ्यासकांच्या संक्षिप्त मुलाखती प्रसारित केल्या.

या काळामध्ये सुरू असणारी राजकीय पक्षांमधील बंडखोरी व उलथापालथींच्या धामधुमीतही प्रसारमाध्यमांनी प्रयासच्या अहवालास पुरेशी प्रसिद्धी देऊन आपद्ग्रस्तांच्या प्रश्नास न्याय दिला असेच म्हणावे लागेल. याशिवाय, या प्रश्नावर काम करणाऱ्या जागरूक लोकप्रतिनिधींशी प्रयासची भेट घडवण्यात काही पत्रकारांनी खास पुढाकार घेतला. माध्यमांकडून मिळालेले हे विविध प्रकारचे सहाय्य विधिमंडळ स्तरावरील जनवकिलीच्या प्रयत्नांमध्ये अतिशय उपयुक्त ठरले.

# विधिमंडळ स्तरावरील प्रयत्न

## कोकणातील लोकप्रतिनिधींच्या भेटी

विधिमंडळ स्तरावरील प्रयत्नांच्या पूर्वतयारीचा एक भाग म्हणून डिसेंबर २००५ च्या पहिल्या आठवड्यात प्रयासच्या कार्यकर्त्यांनी रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील एकूण नऊ विधानसभा व विधानपरिषद सदस्यांच्या वैयक्तिक भेटी घेतल्या. या भेटींमध्ये संबंधित लोकप्रतिनिधींच्या मतदारसंघातील प्रश्नांसह अनेक व्यापक बाबींवर चर्चा होऊन, त्यांच्यासमोर अहवालातील प्रमुख मागण्या सादर केल्या गेल्या. या वैयक्तिक भेटींचे आयोजन जनवकिलीच्या प्रयत्नांमध्ये अनेक दृष्टीने महत्त्वाचे ठरले.

कोकणातील अनेक लोकप्रतिनिधींनी पूर व अतिवृष्टीच्या काळात आणि त्यानंतरही आपापल्या मतदार संघात मदत वाटपाच्या समन्वयाचे काम केलेले होते. याबरोबरच मतदारसंघातील नुकसानाची पहाणी करण्यासाठी केलेल्या दौऱ्यांमुळे त्या परिसरातील भौगोलिक परिस्थिती व नुकसानाचे प्रमाण, तीव्रता आदींबाबत लोकप्रतिनिधींना उत्तम जाण होती. त्यामुळे त्या-त्या ठिकाणचे स्थानिक प्रश्न आणि त्यावरील उपाययोजना याबाबत त्यांची निरिक्षणे व अनुभवसिद्ध मते उपयुक्त ठरतील याची प्रयासला जाणीव होती. शिवाय, अतिवृष्टीवरील सदर अहवाल कोकणातील परिस्थितीवर आधारलेला असल्याने कोकणातील लोकप्रतिनिधींनीच अधिवेशनामध्ये अहवालातील मागण्यांची मांडणी केल्यास शासनापर्यंत त्या अधिक प्रभावीपणे पोचतील असेही प्रयासला वाटत होते. या साऱ्या बाबी लक्षात घेऊन उपलब्ध असलेल्या वेळात प्रामुख्याने कोकणातील लोकप्रतिनिधींच्या भेटींना प्राधान्य दिले गेले.

लोकप्रतिनिधींशी चर्चा करताना अतिवृष्टी-पुराशी संबंधित स्थानिक प्रश्न आणि त्यातून पुढे येणारे व्यापक मुद्दे यांचा समतोल राखण्याचा प्रयत्न केला गेला होता. यामुळे चर्चा सर्वस्पर्शी होण्यात मदत झाली. या भेटी आणि चर्चेबाबत मत व्यक्त करतांना लोकप्रतिनिधींनी अहवाल व इतर संदर्भ साहित्याबाबत अनुकूल अभिप्राय दिला आणि प्रयासच्या प्रयत्नांचे स्वागत केले. 'अधिवेशन काळात या मागण्या मांडण्याचा आमच्या मर्यादेत आम्ही निश्चितच प्रयत्न करू' असे आश्वासन लोकप्रतिनिधींनी चर्चेच्या शेवटी दिले. या चर्चेतून पुढे आलेल्या व महत्त्वाच्या वाटणाऱ्या मुद्दयांची लेखी नोंदही अनेक लोकप्रतिनिधींनी करून घेतली.

या वैयक्तिक भेटींच्या दरम्यान लोकप्रतिनिधींसाठी स्वतंत्रपणे तयार करण्यात आलेले माहिती-संच (ॲडव्होकसी किट) देण्यात आले. माध्यमासाठी तयार केल्या गेलेल्या संचातील दस्तावेजांपेक्षा या संचातील टिपणांमधील शिफारसी व मागण्या अधिक व्यवहार्य व शासकीय यंत्रणेच्या कामकाजाच्या

पद्धतींमध्ये बसवता येण्याजोग्या असतील असा प्रयत्न केला होता. प्रत्यक्ष विधानसभा व विधानपरिषदेमध्ये चर्चा सुरू असताना भाषण व मांडणीसाठी उपलब्ध असणारा अत्यल्प वेळ लक्षात घेऊन या संचांमध्ये अहवालातील मागण्या, आक्षेप, व प्रतिवादांचा सारांश मांडण्यात आला होता.

या भेटी व चर्चेदरम्यान असे आढळले की काही लोकप्रतिनिधींना प्रयासच्या अभ्यासकांच्या भेटीआधीच (वर्तमानपत्रे तसेच विविध वृत्तवाहिन्यांद्वारे प्रसारित झालेल्या मुलाखतींमुळे) या अहवालाची माहिती होती. यामुळे त्यांनी प्रयासच्या अहवालाची प्रत मागवून घेतली होती. इतकेच नव्हे तर काही लोकप्रतिनिधींनी अहवाल वाचलेला होता आणि अहवालामध्ये मांडलेली भूमिका आणि शिफारशी/मागण्यांबाबतची त्यांची मते नोंदवून ठेवलेली होती. काही आमदारांनी केलेली पूर्वतयारी प्रयासच्या अभ्यासकांना निश्चितच उपयोगी ठरली.

प्रयासच्या अहवालामध्ये मांडलेल्या काही मागण्यांना सर्वच पक्षांच्या लोकप्रतिनिधींनी विशेष पाठिंबा दर्शवला. उदाहरणार्थ: रोजगार हमीतून शेतजमीन दुरुस्तीची कामे सुरू करण्यासंदर्भातील मागण्या किंवा रेशनकार्डवर सर्वच पूरग्रस्तांना किमान सहा महिने अंत्योदयाच्या दराने धान्य मिळण्याबाबतच्या मागण्या विशेष उचलून धरल्या गेल्या. याबरोबरच अहवालामध्ये मांडलेल्या काही मागण्या स्थानिक प्रश्नांशी निगडित असल्याने संबंधित मतदारसंघातील लोकप्रतिनिधींनी अशा मागण्यांना विशेष पाठिंबा दर्शवला. उदा. पूर-अतिवृष्टीमुळे निर्माण झालेले गुरांचे व चाऱ्याचे प्रश्न सोडवण्यासाठी मांडण्यात आलेल्या उपाययोजना, आदिवासींच्या जमिनीबाबत (जसे की दळी, अतिक्रमित जमीनधारकांना न मिळालेल्या भरपाईबाबत) व उपजीविकेबाबत मागण्या, धोक्याच्या व संवेदनशील भूभागांसंबंधीच्या मागण्या, अशा अनेक मागण्या व उपायांचे महत्त्व त्यांना वाटले. या मागण्यांच्या तुलनेत विशेषत: आपत्तीच्या प्रतिबंधासाठी उपाय व झालेल्या नुकसानाचे जैविक मार्गांनी पुनर्वसन करण्याबाबतच्या मागण्या, तसेच आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रम लोकाभिमुख करण्याबाबतच्या मागण्या व शिफारशी महत्त्वाच्या असूनही याबाबत लोकप्रतिनिधींशी पुरेशी चर्चा झाली नाही.

या भेटींशी जोडूनच राजकीय पक्षांच्या वेगवेगळ्या पदाधिकाऱ्यांशी स्वतंत्रपणे चर्चा करण्यात आली. एका प्रमुख विरोधी पक्षाने पक्षांतर्गत अभ्यास व तयारीचा भाग म्हणून महाराष्ट्रातील पुराचा स्वतंत्र अभ्यास सुरू केला होता. यासाठी एका अभ्यासगटाची नेमणूक करण्यात आली होती. या अभ्यास-गटासोबत स्वतंत्रपणे चर्चा व विचारविनिमय करण्यात आला. यामध्ये दोन्ही बाजूंच्या मुद्द्यांची सविस्तर चर्चा होऊन विधीमंडळ अधिवेशनामध्ये शासनावर दबाव आणण्याच्या दृष्टीने काही मुद्दे निश्चित करण्यात आले.

या वैयक्तिक भेटींमुळे अहवालात मांडलेल्या शिफारशी व मागण्या शासकीय पातळीवरील वाटाघाटींच्या दृष्टीने अधिक व्यवहार्य कशा करता येतील याबाबत काही महत्त्वपूर्ण बाबी प्रयासला शिकण्यास मिळाल्या. उदा. विविध शासकीय खात्यांशी संबंधित मागण्यांचे दस्तावेज स्वतंत्रपणे तयार करावेत.

किंवा शासनस्तरावर वापरल्या जाणाऱ्या पारिभाषिक शब्दांचा वापर शिफारशी मांडताना करायला हवा. अशा प्रकारच्या सूचनांमुळे मागण्या व शिफारशींची मांडणी शासकीय कामकाज पद्धतींशी जोडून घेतल्याने अंमलबजावणीच्या दृष्टीने मागण्या अधिक नेमक्या होण्यास मदत झाली.

## विधिमंडळ अधिवेशनादरम्यान केलेले प्रयत्न

पूर-अतिवृष्टीमुळे झालेल्या हानीची महाराष्ट्रातील व्याप्ती लक्षात घेतल्यास अधिवेशनामध्ये या विषयावर चर्चा होणार हे पूर्वीच स्पष्ट झाले होते. अतिवृष्टीमुळे राज्यभर झालेले नुकसान, नुकसानभरपाई, आपत्ती-व्यवस्थापनाच्या व्यापक उपाययोजना अशा अनेक मुद्द्यांवर योग्य कारवाई व्हावी, या दृष्टीने विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशनास अत्यंत महत्त्व प्राप्त झाले होते. राज्यभरातील आपद्ग्रस्त जनतेला नुकसानभरपाई मिळण्याच्या दृष्टीने आणि आपत्तीमुळे निर्माण झालेल्या दीर्घकालीन समस्या सोडवण्याच्या दृष्टीने अधिवेशनामध्ये योग्य निर्णय व उपाययोजना होतील अशी अपेक्षा होती. याचे महत्त्व लक्षात घेऊन प्रत्यक्ष अधिवेशनाच्या ठिकाणी जाऊन जनवकिलीचे प्रयत्न केल्यास आपद्ग्रस्त जनतेच्या प्रयत्नांना न्याय मिळण्याच्या प्रयत्नांना गती मिळेल अशा हेतूने सदर उपक्रम हाती घेतला.

आपत्तीच्या प्रश्नावर विधिमंडळामध्ये व्यापक व मुद्देसूद चर्चा व्हावी यादृष्टीने कोकणाव्यतिरिक्त इतर ठिकाणच्या लोकप्रतिनिधींशी वैयक्तिक भेटींद्वारे चर्चा-विचारविनिमय करणे हा या उपक्रमातील सर्वांत महत्त्वाचा भाग होता. आपत्तीबाबत अधिवेशनादरम्यान सत्ताधारी आणि विरोधी पक्षादरम्यान होणाऱ्या चर्चेमध्ये लोकप्रतिनिधींची बाजू बळकट करणे हे या भेटी व विचारविनिमयामागील मूळ उद्दिष्ट होते. याकरिता एकूण बावीस विधानसभा आणि विधानपरिषद सदस्यांशी प्रत्यक्ष भेटून चर्चा व विचारविनिमय करण्यात आला. यामध्ये विधानसभा व विधानपरिषदेमधील विरोधी पक्षनेत्यांसह सर्व प्रमुख विरोधी पक्षाच्या नेत्यांचा व पक्षाचे प्रतोदपद असणाऱ्या सदस्यांचा समावेश होता. याबरोबरच, प्रयासने अतिवृष्टीवरील अहवालामध्ये सुचवलेल्या शिफारशी व मागण्या व्यापक संदर्भामध्ये मांडल्या जाव्यात यासाठी कोकणाशी मिळतीजुळती भौगोलिक परिस्थिती असणाऱ्या महाराष्ट्राच्या इतर विभागांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आमदारांशी चर्चा करण्यात आली.

प्रत्यक्ष चर्चेच्या दरम्यान असे आढळले की सदर अहवाल जरी केवळ कोकणातील परिस्थितीवर आधारित असला तरी या अभ्यासातून पुढे आलेले आपत्तीनिवारणाशी संबंधित असे व्यापक मुद्दे काही आमदारांना महत्त्वाचे वाटले. उदा. रोजगार हमी योजनेच्या निधीमधून आपत्तीला दिला जाणारा तातडीचा प्रतिसाद तसेच आपत्ती निवारण आणि व्यवस्थापनाबाबतीची दीर्घकालीन उपाययोजना करण्यात यावी यासारख्या शिफारशी लोकप्रतिनिधींना महत्त्वाच्या वाटल्या. या अहवालात मांडला गेलेला दृष्टिकोन लक्षात घेऊन अशा शिफारशींचा आपापल्या क्षेत्रातील समस्यांच्या संदर्भात विचार केल्यास त्यातील काही समस्या सोडवण्यास  निश्चितपणे मदत होईल असेही काही प्रतिनिधींनी प्रतिक्रिया देताना सांगितले.

हिवाळी अधिवेशनाच्या कामकाजाच्या दुसऱ्या आठवड्यात सलग पाच दिवस अतिवृष्टी व पुराचा विषय विधानसभेच्या सभागृहाच्या पटलावर चर्चेसाठी मांडण्यात आला. तर, विधानपरिषदेमध्ये या विषयावर सलग दोन दिवस चर्चा झाली. यादरम्यान अनेक लोकप्रतिनिधींनी संबंधित मतदारसंघातील प्रश्न व संभाव्य उपाययोजनांची मांडणी केली. यामधे प्रयासच्या अहवालातील खालील मुद्दयांचा समावेश होता: (१) कोकणातील वैशिष्ट्यपूर्ण नैसर्गिक आणि पर्यावरणीय परिस्थिती लक्षात घेऊन आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने कोकणासाठी स्वतंत्र निकष असणे आवश्यक आहे. यातील नुकसानभरपाईबाबतच्या निकषांचा तातडीने फेरविचार करण्यात यावा. (२) अतिवृष्टी व पुरामुळे झालेले नुकसान रोजगार हमी योजनेद्वारे उत्पादक रोजगार देण्याच्या कामातून भरून काढावे व याशिवाय आपत्ती-व्यवस्थापनाकरिता रोहयोचा निधी विशेषत: आपत्तीनंतरच्या तत्काळ प्रतिसादाकरिता वापरण्यात यावा. (३) आपद्ग्रस्त गावांच्या पुनर्वसनाचे काम करीत असताना पुनर्वसनाच्या, विशेषत: भूसंपादन व घरेबांधणीच्या संपूर्ण प्रक्रियेत लोकांचा सहभाग असावा. भूसंपादन, घरांची रचना व सार्वजानिक सोयींचे आरेखन, याबाबतीत होणाऱ्या सर्व प्रक्रिया व वाटाघाटींमध्ये स्थानिकांचे मत आवर्जून विचारात घेतले जावे. (४) पुराची घटना हीच केवळ आपत्ती न मानता अतिवृष्टीसही आपत्ती मानण्यात येऊन केवळ अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानाची दखल घेऊन संबंधित कुटुंबांना मदत देण्यात यावी. यामध्ये घरांचे नुकसान व शेतीचे नुकसान या दोन्ही प्रकारांची स्वतंत्र दखल घेऊन त्यासाठी वेगवेगळी मदत देण्यात यावी.

वरील मुद्दे अधिवेशनामध्ये मांडले जात असतानाच विधानपरिषदेमध्ये प्रयासच्या अहवालाचा विशेष उल्लेख करून अहवाल सभापतींमार्फत शासनाला सादर करण्यात आला. या वेळी झालेल्या चर्चेला शासनातर्फे उत्तर दिले गेले व उत्तरामध्ये प्रयासच्या अहवालाची दखल घेण्यात येईल असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले.

(तळटीप : या दस्तावेजाच्या मर्यादा तसेच विधिमंडळाच्या अधिकृत इतिवृत्ताची अनुपलब्धता या दोन कारणांमुळे या ठिकाणी विधानपरिषदेतील चर्चेचे नेमके तपशील देता आले नाहीत.)

## जनवकिलीचे इतर प्रयत्न

जनवकिलीच्या या प्रयत्नांचा एक भाग म्हणून कोकण, मुंबई व पुण्यातील विविध ग्रंथालये, प्रकाशनगृहे आणि शैक्षणिक संस्था, महाविद्यालये आणि प्राध्यापक या सर्वांना प्रयासच्या अहवालाच्या प्रती पाठवण्यात आल्या. याशिवाय महाराष्ट्रामध्ये कार्यरत असणाऱ्या विविध सामाजिक चळवळींचे कार्यकर्ते, सामाजिक/स्वयंसेवी संस्था आणि अशासकीय संस्थांनाही सदर अहवालाच्या प्रती पाठवण्यात आल्या.

कोकणातील स्थानिक परिसरातील विविध संस्था/व्यक्तींशी या विषयावर स्वतंत्रपणे चर्चा व विचारविनिमय व्हावा या उद्देशाने गोगटे महाविद्यालय, रत्नागिरी येथे कोकणातील 'पूर-अतिवृष्टीचे

अरिष्ट’ या विषयावर प्रयास व गोगटे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने एक परिसंवाद आयोजित करण्यात आला. विविध विषयातील प्राध्यापक, ज्येष्ठ पत्रकार, आणि सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी या परिसंवादामध्ये सहभागी झाले होते. स्थानिक कार्यकर्ते, ज्येष्ठ नागरिकांसह विद्यार्थ्यांची लक्षणीय उपस्थिती हे या परिसंवादाचे वैशिष्ट्य होते.

याबरोबरच मुंबई विद्यापीठाच्या भूगोल विभागाने सुरू केलेल्या ‘बॉम्बे जिऑग्राफिक असोसिएशन’तर्फे अतिवृष्टी व पूर या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. सदर चर्चासत्रामध्ये भूगोल, शहरी-नियोजन, आपत्ती-व्यवस्थापन या विषयातील शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित होते. या चर्चासत्रामध्ये प्रयासच्या सदस्यांनी आपत्ती-व्यवस्थापन या विषयावर मांडणी केली. प्रयासच्या मांडणीनंतर सत्रामध्ये सहभागी झालेल्या अनेक शैक्षणिक संस्था व तज्ज्ञांनी सदर विषयासंबंधी मांडण्यात आलेल्या दृष्टिकोनाच्या प्रचारप्रसारासाठी एकत्रितपणे काम करण्याचे प्रयासला सूचित केले.

याशिवाय चिपळूण येथे ‘महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर’तर्फे कोकणातील अतिवृष्टी व पूर या विषयावर चर्चासत्र आयोजित केले होते. या चर्चासत्रामध्ये प्रयासतर्फे अहवालातील निष्कर्ष व भूमिकेची मांडणी केली गेली. आपत्तीच्या मुळाशी असणारी पर्यावरणीय कारणे आणि आपत्तीचे ग्रामीण वंचितांच्या उपजीविकेवरील विविधांगी परिणाम याबाबत औद्योगिक क्षेत्रातील तज्ज्ञ व धुरिणांपर्यंत जाणीवजागृती करणे असा या सहभागामागील उद्देश होता. या चर्चासत्राच्या शेवटी महाराष्ट्र स्तरावरील आपत्ती व्यवस्थापन संस्था स्थापण्यात यावी असा ठराव संमत केला गेला. सदर प्रस्तावित संस्थेच्या उभारणीमध्ये प्रयास संस्थेचे योगदान असावे अशा आशयाची विनंती महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स या संस्थेच्या अध्यक्षांनी केली.

वरील चर्चासत्रादरम्यान कोकणामध्ये अतिवृष्टीच्या दरम्यान मोठ्या प्रमाणावर झालेल्या दरडी कोसळण्याच्या घटनांबाबतीत जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया (जी. एस. आय.) या शासकीय संशोधन संस्थेच्या प्रतिनिधींबरोबर विचारविनिमय करण्यात आला. जी. एस. आय. या संस्थेची आपत्तीव्यवस्थापनातील महत्त्वाची भूमिका लक्षात घेऊन या संस्थेच्या संशोधनाच्या कामामध्ये लोकसहभाग असण्याची गरज प्रयासच्या प्रतिनिधींनी अधोरेखित केली. या मुद्दयाचे महत्त्व जी. एस. आय. च्या प्रतिनिधींनी मान्य केले. सदर कामामध्ये प्रयास संस्थेला सहकार्य करण्याचे मान्य केले.

## शासकीय विभागांसोबत विचारविनिमय

हिवाळी अधिवेशनानंतर दि. ५ जानेवारी २००६ रोजी मुंबई येथे राज्य शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने एक बैठक आयोजित केली. या बैठकीसाठी देशभरातून एकूण केवळ १५ विश्वस्त संस्थांना निमंत्रण देण्यात आले होते. सदर बैठकीच्या सुरुवातीसच आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या सचिवांनी

प्रयासच्या अहवालाचा विशेष उल्लेख केला. प्रयासने अहवालामध्ये केलेल्या शिफारशीची दखल घेऊनच आपत्ती व्यवस्थापनामध्ये स्वयंसेवी संस्थांचा सहभाग घेण्याच्या उद्देशाने सदर बैठक बोलावण्यात आली आहे असे बैठकीच्या सुरुवातीसच स्पष्ट केले गेले. या बैठकीमध्ये महाराष्ट्र राज्यामध्ये अतिवृष्टीमुळे तीव्र नुकसान झालेल्या एकूण ९० गावे/वाड्यांचे पुनर्वसन करण्याचा कार्यक्रम मांडण्यात आला. या ९० गावांपैकी ५०% पेक्षा अधिक गावे रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातून निवडण्यात आली आहेत हे आवर्जून नमूद करायला हवे. या पुनर्वसनाच्या कार्यक्रमासाठी एकूण २०० कोटी रु. ची तरतूद करण्यात आली.

## समारोप

शासनाने वर उल्लेखलेला पुनर्वसन कार्यक्रम जाहीर करण्यामध्ये विविध समाजघटकांच्या सहयोगातून प्रयासने केलेल्या अभ्यासाधारित जनवकिलीच्या प्रयत्नांचा थोडा तरी वाटा निश्चितच आहे असे जाणवते. अशा प्रकारच्या कामाचा पुरेसा पूर्वानुभव नसतानाही प्रयासला या टप्प्यापर्यंत पोचणे का शक्य झाले याचा विचार करताना पुढील बाबी लक्षात येतात. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये विविध स्तरावरील समाजघटकांचा सहभाग नसता तर ही प्रक्रिया या टप्प्यापर्यंत येऊ शकली नसती. अहवालातील स्थानिकांच्या अनुभवांची व दृष्टिकोनाची मांडणी, स्थानिक संस्था-संघटनांचे सहकार्य, आपत्तीकडे पहाण्याचा एकात्मिक दृष्टिकोन, प्रसारमाध्यमांचे नियोजनपूर्वक प्रबोधन/शिक्षण आणि लोकप्रतिनिधींचा योग्य वेळी आणि योग्य पद्धतीने (वैयक्तिक गाठीभेठी आणि समर्पक संदर्भ-साहित्य) सहभाग या सर्वांच्या एकत्रित परिणामामुळेच हे शक्य झाले. वरील घटक अधिक पूर्वतयारीनिशी व ताकदीने पुढे आल्यास यापुढेही अशा प्रकारचे प्रयत्न अधिक परिणामांसह फलद्रूप होतील असे समारोप करताना आवर्जून नोंदवावेसे वाटते.

## परिशिष्ट एक :
# कोकणवासियांच्या दृष्टीतून अरिष्टाचे परिणाम, मागण्या व उपाययोजनांबाबतच्या शिफारसी

### अरिष्टाचे परिणाम

अतिवृष्टी आणि पुराच्या अरिष्टाचा तुकड्यातुकड्यात विचार न करता, एकसंध दृष्टीने बघताना असे दिसते की या अरिष्टामुळे 'अन्नसुरक्षे'चा (फुड सिक्युरिटी) प्रश्न केवळ वंचित कुटुंबांसाठीच नव्हे तर बहुसंख्य कोकणवासियांसाठी गंभीर होणार आहे. कारण अन्नधान्याचा स्रोत असणाऱ्या महत्त्वाच्या साधनांचे, म्हणजेच शेतजमीन आणि नदी, जंगल, डोंगर-उतार अशा नैसर्गिक संसाधनांचे गंभीर नुकसान झाले.



यातील बहुतेक नुकसान लगेच भरुन येणे अवघड असल्याने त्यांच्याशी निगडित असणारी शेती, मच्छिमारी, फाटी विकणे अशासारखी उपजीविकेची कामे आणि विविध प्रकारची शेतमजुरीही दीर्घकाळासाठी धोक्यात आली आहे. त्यामुळे अन्नधान्याचा तुटवडा तात्पुरता नव्हे, तर अनिश्चित काळासाठी स्थानिक जनतेला भेडसावणार आहे. त्यातही ज्या वंचितांसाठी 'दोनवेळचा प्रश्न' एरवीही बिकट असतो, त्यांच्यासाठी तर हा प्रश्न अधिकच तीव्र होणार आहे. त्यांच्यापैकी अनेकांनी एव्हाना स्थलांतराचा मार्गही पत्करला आहे.

नैसर्गिक संसाधनांच्या जोडीनेच पिके, घरे-गुरे-अन्नसाठे यांचे नुकसानही मोठ्या प्रमाणात झालेले दिसते. पिकांच्या नुकसानाची शासनाने काही प्रमाणात दखल घेतलेली असली तरी गुरे व गोठ्यांच्या (वाडे) नुकसानाकडे मात्र शासनाचे दुर्लक्ष झालेले आहे. चारा टंचाईचा प्रश्नही नजीकच्या भविष्यकाळात उग्र स्वरुप धारण करणार आहे. दरड कोसळून, डोंगरांना भेगा पडल्यामुळे, व तसेच नदीनाल्यांचे काठ खचून अनेक घरे नष्ट झाल्यामुळे लोकांच्या सुरक्षित निवाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. शासनाने पुरामुळे व दरड कोसळून नुकसान झालेल्या घरांबाबत तात्पुरत्या उपाययोजना केल्या आहेत, तर अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानाकडे साफ दुर्लक्ष केले आहे.

या सर्व परिणामांचा एकत्रित विचार करताना असे दिसते की पुराच्या नैसर्गिक अरिष्टाचे रूपांतर कोकणवासीयांसाठी सामाजिक आर्थिक अरिष्टात झालेले आहे. या सामाजिक आर्थिक अरिष्टाची सर्वाधिक झळ आदिवासी, विधवा/परित्यक्ता स्त्रिया, भूमिहीन दलित अशा वंचित गटांना बसली आहे. त्यांची जगण्याची साधनेच नैसर्गिक अरिष्टामुळे उद्‌ध्वस्त झाली आहेत. तातडीने उपाययोजना न झाल्यास हे गट कायमचे देशोधडीला लागतील अशी चिन्हे आहेत. कोकणात स्थलांतर प्रामुख्याने पुरुषांचे होते हे लक्षात घेतले तर मागे राहून घर चालवणाऱ्या स्त्रियांच्या उपजीविकेचा आणि आरोग्य व सुरक्षिततेचा प्रश्नही गंभीर होणार आहे.

अन्नधान्याचा तुटवडा, रोजगारसंधींमधे घट, व जीवनाधार पुरवणाऱ्या नैसर्गिक संसाधनांचे गंभीर नुकसान यांचा एकत्रित परिणाम कोकणातील जनतेला दीर्घकाळ सोसावा लागणार आहे. अन्नधान्याच्या तुटवड्यामुळे तीव्र कुपोषण, आरोग्याचे प्रश्न, उपजीविकेच्या साधनांच्या विनाशामुळे कर्जबाजारीपणा व जगण्यासाठी स्थलांतर, यामधून शोषणात आणि असुरक्षिततेत वाढ, मुला-बाळांच्या भविष्यावर परिणाम अशा दुष्टचक्राला कोकणातील जनतेला सामोरे जावे लागणार आहे. स्त्रिया, आदिवासी, भूमिहीन दलित या वंचित गटांच्या असुरक्षिततेत आणि अगतिकतेत अजूनच वाढ होणार आहे. थोडक्यात, कोकणवासियांच्या उपजीविकेची सुरक्षितताच अनिश्चित काळासाठी धोक्यात आली आहे.

शासकीय पातळीवर मात्र वंचित घटकांच्या विशेष समस्यांचा विचारच झालेला नाही. त्यामुळे, त्यांना गरज असूनही अनेक समाजघटक शासनाने दिलेल्या तातडीच्या मदतीमधून वगळले गेले आहेत. नंतरच्या काळातही, कागदपत्रे नसणे, शासकीय अधिकाऱ्यांपर्यंत पोचण्याची ताकद नसणे अशा नेहेमीच्या अडचणींमुळे या गटांचे पुनर्वसन अधिक बिकट होणार आहे.

या पार्श्वभूमीवर शासनाची अरिष्टाला तोंड देण्याची पूर्वतयारी अत्यंत अपुरी होती असे दिसते. शासकीय यंत्रणेला अशा परिस्थितीत काय करावे याबाबत कोणतेही प्रशिक्षण दिलेले नव्हते. परिणामी, तातडीच्या मदतीच्या काळातदेखील शासनाचा प्रतिसाद अपुरा आणि असंवेदनशील होता.

पूर्वतयारीप्रमाणेच शासनाचे अरिष्ट निवारणाचे प्रयत्नही अत्यंत अपुरे ठरले. नुकसानाचे मोजमाप करण्याच्या प्रक्रियेतील अपारदर्शकता आणि निकषांबाबत स्पष्टतेच्या अभावामुळे अनेक ठिकाणी मोजमापच पूर्ण होऊ शकले नाही. शासनाद्वारे दिलेल्या आदेशांचे पालनही या प्रक्रियेत अनेक ठिकाणी झाले नाही. यामुळे नुकसानाचे प्रमाण प्रत्यक्षात अनेक पटींनी कमी नोंदवले गेले. याबरोबरच बेदखल कुळे, दळीजमीनधारक आदिवासी कुटुंबे, अतिक्रमित जमिनी कसणारी कुटुंबे, शेतजमिनीच्या अपूर्ण नोंदी असणारी, गावठाण/घरठाण नसणारी कुटुंबे नुकसानाच्या प्रक्रियेतून वगळली गेली.

अरिष्ट-प्रतिबंधाचा, म्हणजेच अशा अरिष्टांची पुनरावृत्ती होऊ नये याचा विचारही शासनाने केलेला नाही, ही अत्यंत चिंतेची बाब आहे. अरिष्टाचे मूळ काय याचा विचार झाल्याशिवाय अरिष्ट प्रतिबंधासाठीच्या

उपाययोजनाही आखता येणार नाहीत. परिणामी, केवळ तात्पुरत्या उपायांमुळे या अरिष्टाची अधिक भयावह पुनरावृत्ती अटळ ठरेल.

## अरिष्टाचे मूळ कशात आहे?



कोकणातील नैसर्गिक अरिष्टाच्या मुळाचा शोध दोन कळीच्या मुद्द्यांपाशी थांबतो. (१) मुळातच नाजूक जडण-घडण असलेली नैसर्गिक परिसंस्था आणि (२) या नाजूक जडण-घडणीवर आक्रमण करणारे मानवनिर्मित घटक (रस्ते, रेल्वे, धरणे, कालवे, शहरीकरणामुळे वाढलेले बांधकाम, एकांगी फळबाग व वनीकरण) यातील नैसर्गिक प्रश्न पूर्णत: सोडवता येणार नाहीत. पण कोकणातील निसर्गाच्या अंगभूत वैशिष्ट्यांचा विचार करून अरिष्टाच्या प्रतिबंधासाठी पूर्वतयारी निश्चित करता येईल आणि भविष्यातील नैसर्गिक अपघाताची तीव्रता कमी करता येईल. स्थानिक पातळीवरील मानवनिर्मित कारणे अर्थातच अपरिहार्य नाहीत. त्यामुळे परिसंस्थेच्या संरक्षण व संवर्धनाला प्राधान्य देऊन, मानवी हस्तक्षेपावर योग्य ते निर्बंध घालणे आणि त्यासाठीचे प्रतिबंधात्मक उपाय तातडीने अमलात आणणे निश्चितच शक्य आहे. हीच कोकणातील नैसर्गिक, सामाजिक, आर्थिक अरिष्टावरील कायमस्वरूपी उपाययोजनांची दिशा असायला हवी.

## एसनाकडे केलेल्या मागण्या व उपाययोजनांबाबतच्या शिफारशी

या पार्श्वभूमीवर, वर उपस्थित केलेल्या प्रमुख मुद्द्यांबाबत शासनाकडे केलेल्या महत्त्वाच्या मागण्या, आणि उपाययोजनांबाबतच्या शिफारशी यापुढे मांडलेल्या आहेत:

शासनाने पुरविलेल्या तातडीच्या मदतीसंदर्भातील शिफारशी

● तातडीची मदत पोचवताना भ्रष्टाचार कुठे व कसा झाला याची ताबडतोब चौकशी व्हावी आणि त्यानुसार संबंधितांवर तातडीने व जाहीरपणे कारवाई व्हावी. ● अद्यापही तातडीची मदत पोचलेली नाही, अशी ठिकाणे शोधण्याची आणि त्या त्या ठिकाणी मदत पोचवण्याची प्रक्रिया तातडीने सुरू व्हावी. ● सर्वेक्षणाबाबत स्थानिकांच्या तक्रारी नोंदवण्यासाठी तहसीलदार कार्यालयात एक विशेष कक्ष चालू करावा, आणि त्यानुसार पुनर्सर्वेक्षणासाठी आदेश जारी केले जावेत. ● तातडीची मदत सर्व आपद्ग्रस्तांपर्यंत परिणामकारकपणे पोचावी यासाठी स्थानिक पातळीवर दक्षता समित्या नेमण्यासारख्या उपायांचा गांभीर्याने विचार व्हावा. यासाठी आवश्यक त्या प्रक्रिया आतापासूनच सुरु व्हाव्यात. त्याचप्रमाणे तातडीच्या मदतीबाबतच्या धोरणाचाही पुनर्विचार होण्यासाठी स्थानिक पातळीवरील कार्यकर्ते, तज्ज्ञ आणि अभ्यासकांशी विचारविनिमयाची प्रक्रिया तातडीने सुरू व्हावी.

## शेती व शेतजमिनींचे  नुकसान

शेतजमीन हे सर्वसामान्य शेतकऱ्याचे  उपजीविकेचे मूलभूत संसाधन असल्याने संपूर्णपणे नष्ट झालेल्या जमिनीएवढीच जमीन त्याला उपलब्ध करून द्यावी. नुकसान झालेल्या शेतजमिनींचे सर्वेक्षण/पुनर्सर्वेक्षण महसूल विभागाने करावे व हद्द निशाण्या कायम कराव्यात.


शेतजमिनींचे झालेले नुकसान भौगोलिक परिस्थितीनुसार वेगवेगळ्या प्रकारचे असल्याने त्यासाठी आवश्यक दुरुस्तीची कामे व त्यासाठी लागणाऱ्या खर्चाचा अंदाज या सर्वाचा सखोल, तपशीलवार आराखडा लोकसहभागाने तयार करणे आवश्यक आहे. झालेल्या नुकसानाचे प्रमाण बघता भरपाईच्या निधीतून शासन देऊ शकणारे साहाय्य मर्यादित असल्याने या कामाला अन्य योजनांतून सुद्धा आर्थिक साहाय्य करावे लागेल. उदा. शासनाने जाहीर केल्याप्रमाणे शेतजमिनींच्या दुरुस्तीची कामे रोहयोमार्फत केली जाऊ शकतात.



अतिवृष्टीने घडवलेल्या नुकसानाच्या तुलनेत जाहीर केलेली नुकसानभरपाई लोकांना अत्यंत तुटपुंजी वाटते. त्यामुळे शेतीमधील गुंतवणूक, श्रम यांचा विचार करून आणि नुकसानाचा व्यवस्थित आढावा घेऊन पीक नुकसानासाठी मदत जाहीर करावी. ही रक्कम शेतात प्रत्यक्ष कसणाऱ्या शेतकऱ्याला मिळावी.

## घरे, गुरे व सार्वजनिक सुविधा

असुरक्षित ठिकाणी असलेल्या घरांबाबत विविध क्षेत्रातील (नियोजन, भूगर्भशास्त्र इ.) तज्ज्ञांची एकत्रित मदत घेऊन गाव/वस्तीनियोजनाच्या दृष्टीने नियम आणि निकष तयार करावेत. अतिवृष्टिग्रस्त घरांच्या दुरुस्तीचा प्रश्न अतिशय गंभीर आहे हे लक्षात घेऊन इंदिरा आवास योजना किंवा आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत राबवल्या जाणाऱ्या घरदुरुस्ती योजनेच्या धर्तीवर घरांच्या दुरुस्तीसाठी आर्थिक पाठबळ द्यावे.



ज्या घरांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे अशा घरांच्या पुनर्वसनासाठी शासनमालकीची जागा उपलब्ध नसल्यास खाजगी पड जमिनी संपादित कराव्यात. घरांचे बांधकाम 'इंदिरा आवास योजनेच्या' धर्तीवर न करता पुनर्वसित घरांसाठी घरठाण म्हणून किमान दोन ते अडीच गुंठे जागा पुनर्वसित गावठाणामध्ये मिळावी. नुकसानग्रस्त कुटुंबांच्या मूळ घरांना (पडझड नाही परंतु धोका आहे अशा) 'शेतघरे' असा दर्जा देऊन तेथील चांगल्या अवस्थेतील घरांचा गरजेपुरता वापर करण्याची संधी देण्यात यावी.

जनावरांच्या विविध प्रकारच्या नुकसानाचे स्वतंत्रपणे मूल्यमापन करून त्याकरता वेगळी नुकसानभरपाई द्यायला हवी. पीक नुकसानामुळे पुढे उद्‌भवणाऱ्या चाराटंचाईसाठी शासनाने वेळीच उपाययोजना करणे व त्यासाठी आधीपासून तयारी करणे गरजेचे आहे.

पाणीपुरवठयाच्या प्रश्नावर तातडीचे उपाय म्हणून प्रत्येक वाडी-गावातील पुरेसा पाणीसाठा असणारी किमान एक विहीर दुरुस्त करावी अथवा बांधण्यात यावी. पाणीपुरवठा योजनांच्या नुकसानावर त्वरित उपाय म्हणून सर्व ठिकाणी सरसकट दुरुस्तीची कामे हाती घेतली जावीत.

## आदिवासी, भूमिहीन, दलित आणि स्त्रियांच्या संदर्भातील शिफारसी

● कोकणातील सर्व पूरग्रस्त क्षेत्रांमध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत अंत्योदयच्या दराने धान्य, कडधान्ये, व तेल उपलब्ध करून द्यावे. यामध्ये आदिम जमाती व इतर अनुसूचित जमाती असा भेद ठेवू नये.

●मजुरीच्या प्रश्नाची तीव्रता कमी करण्यासाठी रोजगार हमी योजनेची कामे सुरू करणे आवश्यक आहे. ही कामे पंचक्रोशी स्तरावर सुरू केल्यास आदिवासी आणि दलितांमधील स्थलांतराचे प्रमाण कमी करण्यास मदत होईल.

●आरोग्याच्या समस्यांवर उपाय म्हणून आदिवासी व दलित समाजांच्या वाड्यांसाठी आरोग्य खात्याने विशेष मोहीम हाती घेऊन विविध साथीचे आजार आटोक्यात आणण्याचे प्रयत्न करायला हवेत.

●आपत्ती व्यवस्थापन व निवारणाच्या सर्वच बाबींमध्ये स्त्रियांचा सर्वंकष विचार करणे आवश्यक आहे. जसे की,

(१) आपत्तीप्रवण भागात आपत्ती-पूर्वतयारीसाठी स्त्रियांच्या व शक्य तेथे महिला ग्रामसभांच्या सहभागातून गावसमित्या तयार करण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करावी. (२) 'नुकसानभरपाई देताना ती घरातील स्त्रियांच्या नावे द्यावी' असे आदेश शासनाने गावपातळीवरील मदतयंत्रणेसाठी काढावेत. (३) किमान येत्या सहा महिन्यांसाठी सर्व पूर-अतिवृष्टिग्रस्त स्त्रियांसाठी पोषक आहार योजना सुरू करावी. आदिवासी व भूमिहीन स्त्रियांसाठी ती पुढील दिवाळीपर्यंत चालू ठेवावी. (४) पुढच्या दिवाळीपर्यंत स्त्रियांसाठी किमान तालुकापातळीवर नियमितपणे आरोग्य-तपासण्या आयोजित केल्या जाव्यात. या तपासणीसाठी स्त्री डॉक्टर उपस्थित असणे बंधनकारक करावे.

## अरिष्ट-प्रतिबंधासाठी मूलगामी उपाययोजनांसंदर्भातील शिफारशी

अतिवृष्टीचे रूपांतर पुराच्या अरिष्टात होण्यामागे असणाऱ्या मानवनिर्मित व नैसर्गिक कारणांचा साकल्याने अभ्यास करून त्यावर आधारित कृती कार्यक्रम राबवण्याची गरज आहे. यासाठी शासनाने मुंबईसाठी नेमलेल्या चितळे समितीच्या धर्तीवर कोकणासाठी व्यापक कार्यकक्षा असणारी, बहुशाखीय, व लोकसहभागी पद्धतीने अभ्यास करणारी स्वतंत्र समिती नेमावी.

कोकणातील विकास कामे व त्यासाठी पूरक उद्योग (खाणकाम, वाळू उपसणे, दगडखाणी इ.) चालवताना नाजूक स्थितीत असणाऱ्या स्थानिक नैसर्गिक परिसंस्थेला धोका पोहोचणार नाही ही काळजी घेतली जायला हवी. या समितीने ठोस व नेमके निकष तातडीने तयार करून त्यांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक यंत्रणा सरकारने उभी करावी.

विविध विकास कामांमुळे नुकसान वाढल्याचे स्पष्ट पुरावे जेथे उपलब्ध आहेत तेथे अशी विकास कामे त्वरित रोखण्यात यावीत. अशा विकास कामांच्या कर्त्यांना किंवा मालकांना नुकसानास जबाबदार धरून बाधित लोकांना नुकसानभरपाई देणे बंधनकारक करावे.

पूर नियंत्रणासाठी केवळ निव्वळ अभियांत्रिकी उपायांचा (अतिरिक्त पाणी दुसऱ्या नदीखोऱ्यात वळवणे, धरणाद्वारे नियंत्रित निस्सारण, धूप प्रतिबंधासाठी पक्क्या भिंती बांधणे, इ.) विचार करणे योग्य नाही. त्याऐवजी परिसंस्थेच्या एकात्मिक दृष्टिकोनातून पुढे येणाऱ्या नैसर्गिक किंवा जैविक उपायांना आवश्यक तेथेच अभियांत्रिकी उपायांची जोड देणे गरजेचे आहे. त्यासाठी नैसर्गिक किंवा जैविक उपाय या शाखेचा विकास होण्याची गरज आहे. हे लक्षात घेऊन, आपत्ती प्रतिबंधासाठी काम करणाऱ्या वेगवेगळ्या खात्यांमध्ये जैविक उपायांच्या विकासासाठी जैव-अभियांत्रिकी विभाग सुरू करावा.

या सर्व मागण्यांबाबत अपुरा निधी, अपुरे मनुष्यबळ अशा प्रकारच्या नेहेमीच सांगितल्या जाणाऱ्या अडचणी आताही सांगितल्या जातील. हे व्यवहार्य नाही असा आक्षेपही या मागण्यांवर घेतला जाऊ शकतो. अर्थात, राजकीय इच्छाशक्ती दाखवल्यास आणि स्थानिकांच्या सहभागातून पारदर्शक कारभार यांची सांगड घातल्यास, या मागण्या प्रत्यक्षात आणणे निश्चितच शक्य आहे आणि हे करणे हा शासनयंत्रणेच्या बांधिलकीचा अविभाज्य भाग आहे. असे शेवटी नमूद करावेसे वाटते.

परिशिष्ट दोन

# जनवकिलीच्या प्रयत्नांमध्ये साथ देणारे लोकप्रतिनिधी, संस्था-संघटना, वृत्तपत्रे, वृत्तपत्र-संघ, वृत्तवाहिन्या

## लोकप्रतिनिधी

| | | |
|---|---|---|
| श्रीमती नीलम गोऱ्हे | शिवसेना | सदस्य, विधान परिषद |
| श्री. देवेंद्र साटम | शिवसेना | सदस्य, विधान सभा |
| श्री. रामदास कदम | शिवसेना | विरोधी पक्षनेते, विधानसभा |
| श्री. बबनराव पाचपुते | राष्ट्रवादी काँग्रेस | वनमंत्री, पालकमंत्री, जि. रत्नागिरी |
| श्री. माणिक जगताप | राष्ट्रवादी काँग्रेस | सदस्य, विधान सभा |
| श्री. सुनील तटकरे | राष्ट्रवादी काँग्रेस | मंत्री, अन्न व नागरी पुरवठा विभाग |
| श्री. उदय सामन्त | राष्ट्रवादी काँग्रेस | सदस्य, विधान सभा |
| श्री. रमेश कदम | राष्ट्रवादी काँग्रेस | सदस्य, विधान सभा |
| श्री. गोपीनाथ मुंडे | भाजप | सदस्य, विधान सभा |
| श्री. पांडुरंग फुंडकर | भाजप | विरोधी पक्षनेते, विधान परिषद |
| श्री. एकनाथ खडसे | भाजप | सदस्य, विधान सभा |
| श्री. विनय नातू | भाजप | सदस्य, विधान सभा |
| डॉ. अशोक मोडक | भाजप | सदस्य, विधान सभा |
| श्री. वामनराव चटप | स्वतंत्र भारत पक्ष | सदस्य, विधान सभा |
| श्री. राजू शेट्टी | शेतकरी संघटना (स्वाभिमानी) | सदस्य, विधान सभा |
| श्री. सुभाष बने | शिवसेना | सदस्य, विधान सभा |
| श्री. बाबासाहेब कुपेकर | राष्ट्रवादी काँग्रेस | अध्यक्ष, विधानसभा |
| श्री. शिवाजीराव देशमुख | काँग्रेस (इं.) | सभापती, विधान परिषद |
| श्री. विवेक पाटील | शेतकरी कामगार पक्ष | सदस्य, विधान सभा |
| श्री. जयंतराव पाटील | शेतकरी कामगार पक्ष | सदस्य, विधान परिषद |
| श्री. नरसय्या आडाम | मा.क.प. | सदस्य, विधान सभा |
| श्री. जीवा पांडू गावीत | मा.क.प. | सदस्य, विधान सभा |
| श्री. राजाराम ओझरे | मा.क.प. | सदस्य, विधान सभा |

## संस्था-संघटना

**रायगड** : अंकुर ट्रस्ट, पेण. साकव ग्रामीण विकास प्रकल्प, पेण. श्रमिक क्रांती संघटना. सर्वहारा जन आंदोलन. ग्राम विकास मंडळ, नडगाव, महाड. **रत्नागिरी** : परिवर्तन संस्था, चिपळूण. जनसहयोग प्रतिष्ठान, कोसुंब, ता. संगमेश्वर. ग्रामीण विकास प्रबोधिनी, देवरुख. गोगटे कॉलेज. जनविकास प्रतिष्ठान, माखजन, संगमेश्वर. डी. बी. जे. कॉलेज, चिपळूण . महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर, चिपळूण शाखा. **पुणे** : गंगोत्री संस्था. **मुंबई** : रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी. बॉम्बे जिऑग्राफिक असोसिएशन.

## वृत्तपत्रे

महाराष्ट्र टाईम्स, सामना, टाईम्स ऑफ इंडिया, लोकनायक, लोकसत्ता, तरुण भारत, इंडियन एक्सप्रेस, वार्ताहर, सागर, केसरी, कृषिवल, पुण्यनगरी, पुढारी, नवभारत, रत्नागिरी टाईम्स, ॲग्रोवन, लोकमत, सकाळ, प्रभात, महानगर. (वरील वृत्तपत्रांव्यतिरिक्त मुंबई, पुणे आणि कोकणातील अनेक वृतपत्रांचे प्रतिनिधी पत्रकार परिषदांना आवर्जून उपस्थित होते. यापैकी बहुतांश वृत्तपत्रांनी व साप्ताहिकांनी वरील विषयास नक्कीच प्रसिद्धी दिली असणार. परंतु ठोस माहितीअभावी त्यांची नावे वरील यादीमध्ये समाविष्ट केलेली नाहीत.)

## वृत्तपत्र-संघ

प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया. युनायटेड न्यूज ऑफ इंडिया. पब्लिसिटी आय अँड बी, मुंबई. युनिक फिचर्स, मुंबई महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघ, रत्नागिरी. जिल्हा माहिती कार्यालय, रत्नागिरी.

## वृतवाहिन्या

ई - टीव्ही मराठी. झी - मराठी. झी - हिंदी. सहारा समय. सह्याद्री वाहिनी - दूरदर्शन.
आकाशवाणी - रत्नागिरी. के. टीव्ही रत्नागिरी (जिल्हा). सिटी चॅनल (मुंबई, पुणे).

## प्रयास

प्रयास हा वैद्यकीय व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील काही व्यावसायिकांनी एकत्र येऊन स्थापलेला व कायद्यानुसार नोंदलेला सार्वजनिक विश्वस्त निधी आहे. प्रयासच्या वतीने 'आरोग्य', 'ऊर्जा', 'शिक्षण व पालकत्व' तसेच 'संसाधने व उपजीविका' ह्या क्षेत्रांत अनेक उपक्रम चालवले जातात. आपले व्यावसायिक ज्ञान व कौशल्ये वापरुन समाजातील वंचित वर्गांच्या स्वउन्नतीसाठीच्या प्रयत्नांना व संघर्षांना साहाय्यभूत ठरावे ह्या उद्देशाने प्रयासचे सदस्य काम करीत असतात. संशोधन, विश्लेषण, प्रशिक्षण, माहितीचा प्रसार, लोकजागृती, व जनवकिली इ. विविध मार्गांनी वरील उद्देशांच्या पूर्तीसाठी प्रयत्न केले जातात.

## संसाधने व उपजीविका गट

२००० सालापासून प्रयास ऊर्जा गटांतर्गत 'संसाधने व उपजीविका' गट कार्यरत आहे. या गटामध्ये प्रामुख्याने नैसर्गिक संसाधने व त्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांच्या उपजीविका या विषयावर काम सुरू आहे. वंचित घटकांच्या उपजीविकेचा प्रश्न विकासावरील चर्चेच्या व कार्यक्रमांच्या केंद्रस्थानी यावा यासाठी 'संसाधने व उपजीविका' गट काम करीत आहे. या गटातर्फे खालील विषयांवर काम चालू आहे:

- शाश्वत उपजीविकेवर आधारित विकासविषयक दृष्टिकोनाची मांडणी व प्रसार
- वंचित घटकांना विकास योजना/कार्यक्रमांची आखणी, अंमलबजावणी, नियमन यावर प्रभाव टाकता यावा यासाठी उपयुक्त साधनांचा विकास
- रोजगार हमी योजनेतील बदलांच्या प्रश्नावर विविध संस्था-संघटनांच्या संयुक्त प्रयत्नांना अभ्यास, विश्लेषण याद्वारे पाठबळ
- कमी-बाह्य-साधनांच्या शाश्वत शेतीच्या पद्धतींचे विकसन, प्रत्यक्षदर्शन, प्रशिक्षण व प्रसार



**प्रयास**
अमृता क्लिनिक
आठवले कॉर्नर, कर्वे रोड
पुणे ४११००४